क्र.अका/नझूल/प्रसिध्दी/कावि-४५६/१३
कार्यालय जिल्हाधिकारी,वर्धा
दिनांक : २० जुलै,२०१३

## जाहिरात

जिल्हाधिकारी कार्यालयातील नझूल शाखेत असलेल्या संपुर्ण प्रकरणांची शासनाकडून प्राप्त झालेल्या आज्ञवलीत शासनाचे निर्देशाप्रमाणे डाटा एन्ट्री व स्कॅनिंग करुन ऑनलाईन अपलोडींग करावयाचे असल्याने याव्दारे दोन वेगवेगळ्या बंद लिफाप्यामध्ये निवीदा मागविण्यात येत असून सदर निवीदा दि.०५ /०८/२०१३ दुपारी २.०० वाजेपर्यंत निवासी उपजिल्हाधिकारी / अधिक्षक , जिल्हाधिकारी कार्यालय,वर्धा यांचेकडे सादर कराव्यात. प्राप्त झालेल्या निविदा दिनांक ०५ /०८/२०१३ ला दुपारी ४.०० वाजता जिल्हाधिकारी यांचे समोर उघडण्यात येईल. निविदा बाबत सविस्तर माहिती अटी व शर्ती www.wardha.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उपरोक्त दिनांकानंतर प्राप्त निविदांचा विचार केला जाणार नाही.

जिल्हाधिकारी,वर्धा

प्रतिलिपी :-

१. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी यांना माहिती तथा सदर जाहिरात व निविदा फार्म जिल्हयातचे वेबसाईडवर प्रसिध्द करावी.
२. जिल्हा माहिती अधिकारी,वर्धा यांना माहिती तथा सदर जाहिरात विनामुल्य स्थानिक वृत्तपत्रातुन प्रसिध्दी देवून वृत्तपत्राचे कात्रण या कार्यालयात सादर करावे.

जिल्हाधिकारी,वर्धा

| अ.क्र. | तपशील | शेरा |
|---|---|---|
| १. | संस्थेचे पुर्ण नांव | |
| २. | सस्थेचा पत्रव्यवहाराचा पुर्ण पत्ता (ई-मेल व दुरध्वनीसह) | |
| ३. | संस्था नोंदणी क्रमांक तथा नोंदणी प्राधिकाऱ्याबाबत माहिती तथा यापुर्वीचा काही अनुभव असल्यास त्याबाबतचे कागदपत्रे | |
| ४. | डि.डि.क्रमांक व दिनांक बॅकेचे नांवसह | |
| ५. | अटी व शर्ती मध्ये नमुद केल्याप्रमाणे सर्व बाबीची पुर्तता तांत्रिक लिफाप्यात असणे आवश्यक आहे. | |

## अनुक्रमांक -१

## जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा

जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा येथील नझुल शाखेतील नझुल प्रकरणांची स्कॅनिंग,ऑनलाईन अपलोडिंग तसेच डाटा एंन्ट्री करीता करारासाठी निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख / /२०१३ ला दुपारी २.०० वाजेपर्यत
निविदा उघडण्याची तारीख / /२०१३ ला दुपारी १२.०० वाजता

### दर पत्रक नमुना व अटी शर्ती

१. जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा येथील नझुल शाखेतील नझुल प्रकरणांची स्कॅनिंग,ऑनलाईन अपलोडिंग तसेच डाटा एंन्ट्री करीता करार करणेबाबत

२. विहित नमून्यातील निविदा दोन वेगवेगळया लिफाप्यात दिनांक / /२०१३ ला दुपारी २.०० वाजेपर्यत निवासी उपजिल्हाधिकारी व ते उपलब्ध नसल्यास अधिक्षक, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथे स्विकारण्यात येईल, कोणत्याही कारणाने यानंतर प्राप्त झालेले दर पत्रकाचा विचार केल्या जाणार नाही. विहित नमून्यातील निविदा स्विकारण्यात येईल, तसेच दर पत्रक पाकिटावर ठळक अक्षरात जिल्हाधिकारी, वर्धा यांचे अधिनस्त नझुल शाखेतील नझुल प्रकरणांची स्कॅनिंग,ऑनलाईन अपलोडिंग तसेच डाटा एंन्ट्री करीता असे स्पष्ट लिहावे.तसेच दरपत्रक खरेदी केल्यानंतर शासकीय पावतीचा क्रमाक दरपत्रकावर टाकावा.

३. प्राप्त झालेली निविदा दिनाक / /२०१३ ला दुपारी १२.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा येथे जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी,उपजिल्हाधिकारी सामान्य व लेखाधिकारी यांचे समक्ष उघडण्यात येतील दर पत्रक धारकांना स्वत: किंवा त्यांचे प्रतिनीधीद्वारे त्यांची इच्छा असेल तर यावेळी उपस्थित राहता येईल.

४. निविदा मंजुर झाल्यास १० दिवसाचे आत रुपये २००/- चा कोर्ट स्टॅम्पवर करारनामा करणे आवश्यक राहील.

५. निविदा धारकांना निविदा मध्ये दर्शविलेले दर संपुर्ण काम संपेपर्यत बंधनकारक राहतील.

६. नझुल शाखेतील नझुल प्रकरणांची स्कॅनिंग,ऑनलाईन अपलोडिंग तसेच डाटा एंन्ट्री करीता आदेश दिल्यापासुन ५ दिवसाचे आंत आदेशीत केल्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालय,वर्धा आपले साहित्य स्थापित करुन कार्यवाहीस सुरुवात करावी.

७. नझुल शाखेतील नझुल प्रकरणांची स्कॅनिंग,ऑनलाईन अपलोडिंग तसेच डाटा एंन्ट्री करीता लागणारे सर्व साहित्य जसे (संगणक, प्रिंटर.कारटेज,स्कॅनर, इंटरनेट तसेच ऑपरेटर इ.) व्यवस्था करण्याची जबाबदारी निविदा धारकांची राहिल.

८.नझुल शाखेतील नझुल प्रकरणांची स्कॅनिंग,ऑनलाईन अपलोडिंग तसेच डाटा एंन्ट्री करीता लागणाऱ्या ऑपरेटरची मानधन जिल्हाधिकारी कार्यालय तर्फे देण्यात येणार नाही.

९.नझुल प्रकरणांची स्कॅनिंग,ऑनलाईन अपलोडिंग तसेच डाटा एंन्ट्री चे काम दर महिन्यात होणाऱ्या कामाच्या ८०% रक्कम देण्यात येवुन उर्वरित २०% रक्कम कामाची तपासणी झाल्यानंतर अदा करण्यात येईल.

१०.नझुल शाखेतील नझुल प्रकरणांची स्कॅनिंग,ऑनलाईन अपलोडिंग तसेच डाटा एंन्ट्री करीता निविदा सादर करतांना निविदा धारकांचा वार्षीक उलाढाल ( Turn Over) कमीत कमी रुपये १० लक्ष असणे आवश्यक आहे व त्याकरीता निविदासोबत जमा खर्च विवरण पत्र सोबत जोडावे.

११.निविदा धारकांचे Incomtax Return, Vat No., Service tax No. असणे आवश्यक आहे.
१२. निविदा धारकांनी निविदा दोन वेगवेगळ्या लिफाप्यात

१. **लिफापा क्रमांक -१** Technical Bid :- ( Incomtax Return, Vat No., Service tax No., कंपनी/संस्था/शॉप ॲक्ट परवाना,तिन वर्षाची Balance sheet, अनुभव प्रमाणपत्र,अनामत रकमेचा DD इतर)

२. **लिफापा क्रमांक -२** Commercial :- दर पत्रक, अनषांगीक कागदपत्रे तसेच अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे पत्र

१३. निविदा धारकांनी मागील ५ वर्षाचे अनुभव असल्याचे प्रमाण पत्र निविदे सोबत जोडावे.
१४. निविदा धारकांचे कंपनी/संस्था/शॉप ॲक्ट परवाना असणे आवश्यक आहे.
१५. निविदा धारकांनी निविदा सादर करते वेळ रुपये १०,०००/- चे EMD जिल्हाधिकारी वर्धा यांचे नावाने DD दयावा.
१६. ज्या निविदा धारकांची निविदा मंजुर होईल त्यांना रुपये १५,०००/- जिल्हाधिकारी वर्धा यांचे नांवाने DD सुरक्षा ठेवीचे रुपात भरावे लागतील
१७. कोणतेही कारण न देता निविदामध्ये दर्शविलेले दर (अंशत: किंवा पुर्णत:) अमान्य किंवा मान्य करण्याचा पुर्ण अधिकार जिल्हाधिकारी वर्धा यांना राहील.
१८. मंजुरी आदेश देण्यात आलेल्या निविदा धारकांने काम मधेच सोडुन गेल्यास त्यांना कोणत्याही प्रकारची रक्कम परत/अदा करण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी.
१९. काम पुर्ण करण्याची मुदत आदेशाचे/करारनामाचे दिनांकापासुन २ महिने राहिल विहित मुदतीत काम पुर्ण न केल्यास प्रति दिवस १०० रुपये प्रमाणे दंड भरावा लागेल.
२०. संपुर्ण निविदा प्रक्रियेत बदल करण्याची , स्विकारण्याची ,संपुर्ण प्रक्रीय रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहे.

**निविदा फॉर्म रुपये ५००/- जिल्हाधिकारी कार्यालय,वर्धा जिल्हा नाझर यांचेकडे जमा केल्यानंतर उपलब्ध केले जातील.**

दिनांक / /२०१३

निविदा धारकाची स्वाक्षरी
व पुर्ण पत्ता दुरध्वनीसह

## लिफाफा क्रमांक - २

**दर पत्रक**

प्रति,

जिल्हाधिकारी ,
वर्धा

विषय :- जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा येथील नझुल शाखेतील नझुल प्रकरणांची कॅनिंग,ऑनलाईन अपलोडिंग तसेच डाटा एंन्ट्री करणकरीता निविदा मागविण्याबाबत

संदर्भ :- आपले कार्यालयाने प्रसिध्द केलेली जाहीर निविदा दिनांक / /२०१३

वरील विषयाचे अनुषंगाने सादर करण्यात येते की , प्रसिध्द जाहीर निविदेमधील सुचनेच्या अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक लिफाप्यामध्ये संस्थेबद्दल दयावयाची माहिती पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | साईज | प्रती पान प्रति स्कॅन रुपये ( डाटा एंन्ट्री + अपलोडिंग ) |
|---|---|---|
| १ | A-४ | |
| २ | Legal | |
| ३ | A-३ | |

दिनांक :-

निविदा धारकाची स्वाक्षरी
व पुर्ण पत्ता दुरध्वनीसह